संदर्भ क्र. ध.आ./न्यायशाखा/ ४१६/१५ दि. ८.४.२०१५

0 8 APR 2015

क्रमांक .1726/15

धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य
मुंबई यांचे कार्यालय
धर्मादाय आयुक्त भवन, ३ रा मजला
८३, डॉ. ॲनी बेझंट रोड
वरळी, मुंबई ४०० ०१८

परिपत्रक

धर्मादाय सह आयुक्त,
मुंबई / बृहन्मुंबई/नाशिक/पुणे/औरंगाबाद/नागपूर/अमरावती/लातुर/कोल्हापुर

विषय : कार्यालयातील दैनंदिन न्यायिक कामकाजाबाबत.
संदर्भ : परिपत्रक क्र. 323 /2006 व 415 / 2015

महाराष्ट्र राज्यातील सर्व धर्मादाय सह आयुक्त यांना याद्वारे सुचित करण्यात येते कि, कार्यालयीन कामकाजात सुसुत्रता व गती येण्यासाठी खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

1. आपले कार्यालयात असलेल्या वेगवेगळया कलमांच्या अनुषंगाने ठेवण्यात आलेल्या नोंदवहया हया एकत्र करुन येणा-या प्रकरणांना सलग क्रमांक देण्यात यावे जेणेकरुन कार्यालयात असलेल्या एकुण प्रलंबित प्रकरणांची स्थिती तात्काळ अवलोकन होईल. सदर क्रमांक देताना प्रकरण क्रमांक / कलम/ वर्ष अशी पध्दत अवलंबण्यात यावी. उदा. 25/41D/2015.

2. न्यायीक प्रकरणे ही आवक लिपिकामार्फत जुन्याच पध्दतीप्रमाणे सर्व टपालांसोबत एकत्रीत स्वीकारण्यात येऊ नयेत. सदरची न्यायीक प्रकरणे स्वीकारण्यासाठी कार्यालयातील जबाबदार कर्मचारी याची नेमणुक करण्यात यावी. सदर जबाबदार कर्मचारी कार्यालयात प्राप्त झालेली न्यायीक प्रकरणे योग्य त्या जुजबी पडताळणी नंतर स्वीकारेल. त्यावेळी संबंधित अर्जदारांना आठ दिवसानंतरची तारीख देण्यात येईल. अशी प्राप्त प्रकरणे नोंदणी क्रमांक दिल्यानंतर यापुर्वीच्या परिपत्रकानुसार पडताळणी करुन त्याची टिपणी धर्मादाय सह आयुक्त यांचे समोर सादर करील. सदर टिपणीवर आदेश घेवून त्याबाबत अर्जदाराला तो ज्या दिवशी येईल त्या दिवशी त्रुटींची कल्पना देण्यात येवुन व ज्या प्रकरणांत गैरअर्जदार असतील त्या प्रकरणांत नोटीस किंवा जाहिर नोटीस बाबत नेहमीप्रमाणे कार्यवाही करुन अर्जदाराला त्रुटींची पुर्तता करण्यासाठी व सुनावणीसाठी अंदाजे 30 ते 40 दिवसांची सुनावणीची तारीख नेमुन दयावी. सदर सुनावणीच्या वेळी अर्जदाराने त्रुटी पुर्ण केल्या नाहीत अथवा हजर राहीले नाहीत तर त्यांना दोन वेळा संधी देण्यात यावी व त्यानंतर सकारात्मक दृष्टीने विचार करुन योग्य ती कार्यवाही करावी.

3. कार्यालयात प्राप्त होणा-या न्यायिक प्रकरणांत असलेल्या कर्ज मंजुरीकरिता देण्यात येणारी नाहरकत, कलम 36 अन्वये देण्यात येणारी मुदतवाढ , पुर्नविकास व कलम 47 अन्वयेचे विश्वस्त नेमणुकींबाबतची प्रकरणे सत्वर गतीने सकारात्मकरीत्या निकाली करावी जेणेकरुन कार्यालयातील कामकाजाचा दबाव व प्रलंबित प्रकरणांची संख्या झपाटयाने कमी होईल.

4. वेगवेगळया क्षेत्रातुन या कार्यालयाच्या कामकाजाबाबत नाराजी प्रकट होत असुन ती टाळण्यासाठी कार्यालयात प्राप्त झालेली प्रकरणे अवादादित असल्यास वरीलप्रमाणे कार्यवाहीकरुन साधारणत: सकारात्मक विचारांनी अंदाजे 90 दिवसांत निकाली करावीत व वादादित असल्यास ती प्रयत्नपुर्वक कार्यवाहीकरुन सहा महिन्यांच्या आत निकाली निघतील यासाठी प्रयत्न करावा जेणेकरुन धर्मादाय आयुक्त कार्यालय हे न्यासाच्या किंवा समाजाच्या विकासाआड नाही याची प्रचीती वेगवेगळया क्षेत्रांना होईल. प्रत्येक कार्यालयाने महिन्याच्या 5 तारखेच्या आत कार्यालयातील न्यायिक प्रकरणांची सदयस्थिती मुख्यालयाकडे कळवावी जेणेकरुन शासनाशी चर्चा करणे सोयीचे होईल.

(सही) 8.4.15

धर्मादाय आयुक्त
महाराष्ट्र राज्य, मुंबई.